**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ०५ /०६/२०१८

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०२ शुक्रवार दि.०८ /०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शुक्रवार दिनांक - ०८ /०६/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६ | मा.शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्र.आयो.२०१५/प्र.क्र.११०/ग.निधो-२ (सेल ) दि.९ डिसेंबर २०१५ नुसार पंतप्रधान आवास योजनेतील घटक क्रमांक २ (AHP) अंतर्गत महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती बाबत निविदा मागविणे व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- ६ च्या टिपणीची झेरॉक्स प्रत.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ६ शुक्रवार दि.०८/०६/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्र.आयो.२०१५/प्र.क्र.११०/ग.निधो-२ (सेल ) दि.९ डिसेंबर २०१५ नुसार पंतप्रधान आवास योजनेतील घटक क्रमांक २ (AHP) अंतर्गत महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती बाबत निविदा मागविणे व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

**संदर्भ -** मा.शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्र.आयो.२०१५/प्र.क्र११०/गृनिधो-२ (सेल) दि. ९ / १२/२०१५.

सविनय सादर.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की,केंद्र शासनाने नागरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजना (सर्वासाठी घरे) अंतर्गत AHP या घटकाखाली मनपाच्या प्रकल्पांवर देखरेखीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार PMC नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचा Scope of work खालील प्रमाणे आहे.

१) अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मान्यता घेणे.
२) नकाशास मा.सहाय्यक संचालक,नगररचना विभागाकडून बांधकाम परवाना प्राप्त करून घेणे.
३) Emvorpm,emta; Clearance प्राप्त करून घेणे.
४) निविदा तयार करणे.
५) Tender Evaluation
६) Contract Aggrement तयार करणे.
७) सर्व वर्कींग ड्राईग व आरसीसी डिझाईन तयार करणे.
८) कामावर सुपरव्हिजन करणे.
९) ठेकेदाराचे बिल तपासणे,एम.बी.रेकॉर्ड करणे.
१०)म्हाडा,हुडको /मंत्रालय व इतर शासकीय विभागात मनपाच्या वतीने बैठकीस उपस्थित राहणे.
११) मासिक प्रगती अहवाल सादर करणे.
१२) उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे.
१३) अंतिम अपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे.
१४)थर्ड पार्टी इनस्पेक्शन अहवाल पुर्तता करणे.
१५) कामाचे सादरीकरण व प्रसिध्दी करणे.
१६) रेरा अंतर्गत नोंदणी व पुर्तता बाबत कार्यवाही करणे.
१७) कामाची Complition सर्टिफिकेट बाबत कार्यवाही करणे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) साठी खालील प्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

१) प्रधानमंत्री आवास योजना / म्हाडा अथवा इतर तत्सम संस्थेमध्ये Affordable housing अंतर्गत किमान १००० सदनिका PMC/आर्कीटेक्ट म्हणून कामाचा अनुभव आवश्यक.
२) कंपनीच्या नावाने किमान २ कोटी रक्कमेची वार्षिक उलाढाल आवश्यक.
३) Joint venture गृहीत धरले जाणार नाही.

सद्यस्थितीत मनपानी सादर केलेल्या दोन प्रकल्प अहवालाची रक्कम रू.६५ कोटी इतकी आहे.

सदर प्रकल्प अहवालामध्ये A&O Expense अंतर्गत ३% तरतुद करण्यात आलेली आहे.सदरची रक्कम घरकुल प्राप्त होणा-या लाभार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे.त्यामुळे मनपावर आर्थिक भार पडणार नाही.प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार PMC नियुक्ती करीता प्रकल्प रक्कमेच्या अंदाजे २.५% पर्यत खर्च अपेक्षित आहे.त्यानुसार एकुण ६५ कोटी रक्कमेच्या प्रकल्प अहवालाच्या २.५% नुसार रक्कम रूपये १,६५,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) योजने अंतर्गत AHP या घटकांमध्ये मनपाच्या प्रकल्पावर देखरेख करणे करीता वरील प्रमाणे कामांचा Scope of work चा समावेश करून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार PMC नियुक्ती बाबत निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर करणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,घरकुल योजनेसाठी नेमणेत येणा-या PMC चा खर्च लाभार्थी यांचे कडून प्राप्त होणा-या A&O Expense अंतर्गत ३% रकमेतुन भागविला जाणार असलेने महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही करिता प्रस्तावानुसार घरकुल योजनेसाठी PMC नेमणेकरीता मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,उपरोक्त प्रकल्पा अंतर्गत एकुण सदनिका संख्या नमुद नाही.शासन गृह निर्माण विभाग दि.९ डिसेंबर २०१५ मधील अनु.क्र.१० प्रमाणे विभागाने खात्री करावी.तसेच योजनेसाठी शासन स्तरावर PMC/ थर्डपार्टी नियुक्ती करणार किंवा कसे या बाबत विभागाने खात्री करावी.

यावर उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर, PMAY अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार PMC नेमणुक करणे अंतर्गत एकुण ८४० सदनिकांचा समावेश आहे.तसेच शहरस्तरीय तांत्रिक कक्ष स्थापन करणे बाबत मनपा मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता व अनुदान प्राप्त झाले नाही.मा.शासनाकडुन PMC नेमणुकीबाबत अनुदान प्राप्त होणार नसल्यामुळे डिपीआर मध्ये A&O ची तरतुद करण्यात आली आहे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर,विभागाने प्रस्तावित केल्या प्रमाणे सर्वासाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत PMC बाबत विभागाने प्रस्तावित केल्या प्रमाणे Sunndry of ocost for Housing undor PMSAY for kadgon Ahmadnagar मधील E मधील A&O Expense ३% ofमिधील तरतुदीमधुन PMC च्या खर्चाबाबत विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे E- निविदा प्रक्रीया नुसार कार्यवाही बाबत उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,निविदा मागविणेचे कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठवावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- सर्व विभाग प्रमुख आले आहेत का? कोणत्या विभागाचे अधिकारी नसतील त्यांच्यावर करावाई प्रस्तावित करा.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :- काल पाउस झाला थोडयाच पावसाने पावसाचे पाणी लोकांच्या घारत घुसले याला जाबाबदार कोणी आहे की नाही.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये अतिरीक्त आयुक्त नाहीत,श्री.बोरगे,पैठणकर,अतिक्रमण विभागाचे श्री.इथापे नाहीत.आजच्या सभेला जे नाहीत त्यांना नोटीस देवू.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- अधिका-यांना कोणत्याच गोष्टींचे गांभीर्य नाही.आम्ही सतत प्रश्न मांडायचे,कोणतेच प्रश्न सुटत नाहीत.

मा.सभापती साहेब :- श्री.पैठणकर आले आहेत.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- सभेची वेळ सकाळी ११वा.होती.सर्व जण वेळेववर उपस्थिती आहेत मग हे अधिकारी उशीरा आल्याबद्दल त्यांना विचारणा करण्यात यावी.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :- अधिकारी सभेमध्ये येत नाही हे पुढील सभेमध्ये खपवून घेतले जाणार नाही.अधिका-यांना नागरीकांच्या प्रश्नाशी काही घेणे देणे नाही.नागरीकांच्या रोषाला आपल्याला समोर जावे लागते.

मा.प्र.उपायुक्त श्री.तडवी :- मागच्या महिन्यामध्ये मा.जिल्हाधीकारी यांनी आत्पकालीन व्यवस्थापना बाबत बैठक घेतली.त्यामध्ये सर्व विभाग प्रमुखांना सुचना दिलेल्या आहेत.आपत्कालीन विभाग प्रमुख श्री.मिसाळ आहेत.आपत्कालीन बाबत संपुर्ण आराखडा तयार करताहेत.या बाबत मा.जिल्हाधिकारी साहेबांनी सोमवारी पुन्हा बैठक आयोजीत केली आहे.

मा.सभापती साहेब :- आपत्कालीन आराखडा कोण करीत आहे.

मा.प्र.उपायुक्त श्री.तडवी :- श्री.मिसाळ आराखडा तयार करीत आहेत.

मा.सभापती साहेब :- मिसाळ साहेब तुम्हाला आराखडा केव्हा करायला सांगीतला.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- मागच्या महिन्या मध्ये माझ्याकडे आपत्कालीन व्यवस्थापन विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.परंतु मागच्या महिन्यामध्ये सावेडी कचरा डेपोला आग लागली होती.त्याठिकाणी आमचे आठ दिवस गेले.त्यामुळे आराखडा,नविन माहिती कलेक्ट करायचे काम चालू आहे.साधारण दोन तीन दिवसामध्ये आराखडा पुर्ण होईल.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :- पावसाला सुरूवात झाली तरी तुमचा आराखडा तयार नाही.तुम्ही जर पुस्तकाचे वाचन केले असेल तर तुम्हाला समजेल सात जुन पर्यत सर्व तयारी पुर्ण करावी लागते.सर्व नालेसफाई करावी लागते.शहरामध्ये दोन छोटे पाउस झाले,त्यामध्ये सर्व दानादिन झाली.तुम्ही सांगताहेत आजुन आराखडा तयार नाही.कधी आराखडा तयार होणार आहे हा,आम्हाला नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागते.आमच्या भागातील आंबेडकर चौक,गणेश चौक येथील परिस्थिती तुम्ही पहा.तुम्ही काहीतरी एमरर्जन्सी योजना ठेवली पाहीजे ना.नालेसफाई च्या टेंडरचे का झाले आहे.ते टेंडर कधी होणार आहे.

मा.सभापती साहेब :- तहान लागल्यावर विहीर खोदायची असे चालू आहे.प्रत्येक गोष्टी मध्ये महानगरपालिकेचे नियोजन नाही.पावसाळा चालु झाला तरी आपत्कालीन आराखडा तयार नाही.फक्त बैठका घ्यायच्या,आणि कागदावर काम झाल्याचे दाखवायचे,प्रत्यक्षात कोणतेच काम होत नाही.मा.कलेक्टर साहेबांनी किती तारखेला मिटींग आयोजित केली आहे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- चार तारखेला मिटींग ठेवली आहे.

मा.सभापती साहेब :- चार तारखेला मिटींग झाली. चार दिवसात तुम्ही काय केले.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- चार दिवसांमध्ये विविध डिपार्टमेंट चे जे हेड आहेत.शाळा कॉलेज येथील सर्व माहिती कलेक्ट केली आहे.आराखडा दुरूस्तीचे काम चालू आहे.शंभर सव्वशे पानंचा आराखडा आहे.काही नंबर चेंज झाले आहेत.त्यामुळे आराखडा तयार होण्यास वेळ लागत आहे.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :- कालच्या पावसाने आंबेडकर चौक व गणेश चौकामध्ये पाणी घुसले अशा वेळी कराचे काय की,आराखडा होण्याची वाट पहात बसायचे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- सर्व प्रभाग अधिका-यांना साहित्य दिले आहे.प्रत्येक प्रभाग अधिकारी त्या त्या झोन मध्ये किंवा प्रभागामध्ये त्यांच्या कडे माणसांची नेमणूक सुध्दा केली आहे.काल आम्हाला फक्त पाईप लाईन रोड येथे एक कॉल झाला होता.तेथे जावून तेथील पाणी काढले.यशोदानगर येथे एक झाड पडले होते.ते दिखील आम्ही म्हसेंना सांगून काढून घेतले.आमच्या कडे जेव्हढया तक्रारी येता त्याची आम्ही दखल घेतो.

मा.सभापती साहेब :- त्यांचे म्हणणे आहे की,लोकांच्या घरामध्ये पाणी जाते.त्याबाबत आपण काय उपाययोजना केली आहे.घरात पाणी गेल्यावर तुम्ही काय करता.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- पाणी जाण्याकरीता जर मार्ग नसेल तर आम्ही पंपाने सक्शन करून पाणी काढले जाते.ब-याच ठिकाणी सखोल भागामध्ये पाणी साठते ते पाणी आम्ही काढून देतो.रोडलेव्हलच्या खाली बरीचशी घरे आहेत.त्यामुळे पाणी काढण्यासाठी अडचण येते.प्रभाग अधिकारी,इंजिनीयर्स यांच्या मदतीने काम केले जाते.

मा.सभापती साहेब :- नालेसफाई कोणत्या विभागा कडे आहे.श्री.इथापे कोठे आहेत.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :-अतिरीक्त आयुक्त येत नसतील तर सभा पंधरा मिनीटांकरीता तहकुब करा.जबाबदार अधिकारी सभेमध्ये नाहीत.त्यांचे काम आहे येथे उपस्थित रहायचे.

मा.सभापती साहेब :- मागच्या वेळी कैलास कॉलनी मध्यील घरांमध्ये पाणी गेले होते आपण बंदपाईप केले आहेत.त्याच्या बाजुस आपण चर खोदून पाणी काढले होते.यावेळी सुध्दा मी पत्र दिली आहे.चर खोदल्यास पाणी घरांमध्ये जाणार नाही ते काम अदयाप पर्यत का केले नाही.सांगून दोन महिने झाले तरी काम का झाले नाही.

प्रभाग अधिकारी श्री.सारसर :- आम्ही त्या ठिकाणी गेलो होतो.तेथे काही नागरीकांनी सांगीतले की खाजगी जागा आहे.सोनटक्के साहेब व आम्ही जाणार होतो परंतु मला अर्जन्ट नाशिकला जावे लागले.आज टि.पी.चे कर्मचारी घेवून पहाणी करणार आहे.

मा.सभापती साहेब :- तेथे जे.सी.बी.घेवून जा आणि चर खांदा,लोंकांच्या घरामध्ये पाणी जाते.तो ओढा ताबडतोब मोकळा करा.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :- नालेसफाई चे काम अदयाप चालू झालेले नाही.आत्पकालीन आराखडा तयार नाही.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- तीन वेळा टेंडर रिकॉल केले.आज फायनल कॉल आहे.आज फायनल होवून जाईल.

मा.सभापती साहेब :-पावसाठा अचानक येतो का.सात जुन पर्यत कामे पुर्ण करणे आवश्यक आहे.अधिकारी वेळेवर काम करीत नाहीत.त्याचा रोष नगरसेवकांवर येतो.

मा.अतिरीक्त आयुक्त श्री.वालगुडे :- नालेसफाईचे टेंडरचे तीन कॉल झाले आहेत.छोटे नाले सफाईचे काम चालू आहे.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- दिनांक १९/५/२०१८ पासून छोटे नाले सफाईचे काम चालू केले आहे.प्रत्येक एस.आय.ला दहा कर्मचारी प्रायव्हेट बेसवर देण्यात आले आहे.त्यांच्या मार्फत ४० ते ४५% काम झाले आहे.६०% काम बाकी आहे.१५ दिवसांत काम पुर्ण होईल.

मा.सभापती साहेब :- कोठे कोठे काम झाले.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- त्याची यादी अत्ता माझ्या कडे नाही.मी दुपारी उपलब्ध करून देतो.

मा.सभापती साहेब :- प्रत्येकाला माझे सांगणे आहे.माझ्या कडे नाही.मी पहातो अशी कारणे मला सांगु नका.ही सभा आहे.येतांना सर्व माहिती घेवून यावी.या पुढे असे चालणार नाही.स्थायी ला कारवाई करायला भाग पाडू नका.कोणी कामामध्ये हलगर्जी पण केला तर गय केली जाणार नाही.कारभार गतीमान करावयाचा आहे.तुम्ही येथे बसून असता.आम्हाला जनतेमध्ये जावे लागते.जनतेचा रोष तुम्हाला माहित नसतो.त्यामुळे तुम्ही गतीमान कारभार करा.यापुढे डाररेक्ट कारवाई करण्यात येईल.

मा.अतिरीक्त आयुक्त :- सन्माननीय सदस्य मी सभापतींना एवढेच सांगता होतो की,अजेंडयावर एकच विषय आहे.आणी त्या विषयाकरीता सभा बोलावली होती.सध्या आचारसंहीता चालू आहे.आचारसंहितेच्या काळामध्ये इतर चर्चा न करता अजेंडयावरील विषयावर चर्चा करा.हा आचारसंहितेचा काळ आहे.

मा.डॉ.श्री.सागर बोरूडे :- फक्त लाभाच्या विषयावर चर्चा आचारसंहितेमध्ये करता येत नाही.असे कोठे लिहीले आहे.चर्चा करू नये.

मा.अतिरीक्त आयुक्त :- मी चर्चा करू नये असे म्हटले नाही.मी फक्त एवढेच सांगीतले की अजेंडयावर एकच विषय आहे.

मा.सभापती साहेब :-हि आपली पहिली सभा आहे.त्यामुळे आपण सर्वाना सुचना देवू.कारभार गतीमान करा. पुढील वेळी आपण डायरेक्ट कारवाईचे आदेश दिले जातील.जे अधिकारी नसतील त्यांना नोटीस काढा.

माझी सभापती पदावर निवड झाल्यानंतरची ही पहिली सभा आहे. प्रथमच होणा-या सभेमध्ये गोरगरीबांच्या प्रश्नावरील अत्यंत जिव्हाळयाचा घरकुलाचा विषय मार्गी लागणार असल्याने मला मनस्वी आनंद होत आहे.सभेस उपस्थित मा.उपायुक्त,मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, विभाग प्रमुख व शाखाप्रमुख तसेच पत्रकार बंधू सर्व उपस्थितांचे स्वागत करतो. नगरशहराचा विकासात्कम दृष्टीकोन ठेवून स्थायी समिती मध्ये अनेक विषयांवर चर्चा होवून निर्णय होणे आवश्यक असते या करीता मला सर्व सदस्यांचे व अधिकारी व पत्रकांरांचे सहकार्य अपेक्षित आहे. विकासात्मक कामे करतांना ज्या काही अडचणी येत असतात या अडचणी आपल्या सार्वत्रिक प्रयत्नांनी दुर होवून मिळालेल्या कमी कालावधी मध्ये जास्तीत जास्त विकास कामे करण्याचा मानस आहे. विषयाचे वचन करा.

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबतची सविस्तर माहिती सांगा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- पंतप्रधान आवास योजनेतील घटक क्रमांक २ (AHP) अंतर्गत महानगरपालिकेचे दोन सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाने मान्यता दिलेली आहे.त्यामध्ये केडगांव येथे देवी मंदिराच्यामागे महानगरपालिकेला टि.डी.आर. च्या मध्यमातुन साडे सहा एकर जागा मिळाली आहे.तेथे आपण ६२४ घरे आपण बांधणार आहोत.आपली काटवन खंडोबा मंदिरा जवळ जी स्कीम झाली आहे.तेथेच आपण १.७५ एकरवर आपण २१६ सोळा घरे बांधणार आहोत.या दोन्ही प्राजेक्ट साठी आपल्याला टेंडर काढावी लागणार आहे.तत्पुर्वी आपल्याला केडगांवचे जे क्षेत्रफळ आहे ते २० हजार स्केअर फुटापेक्षा जास्त असल्यामुळे ब-याच गोष्टींचे कंम्पायन्स करून घ्यावे लागणार आहे.लेयर चांगली घ्यावी लागणार आहे.आर्किटेक्चर ड्रॉईग तयार करणे.आर.सी.सी.डिझाईन तयार करणे.सुपरव्हिजन करणे.थर्ड पार्टी इन्सस्पेशन करून घेणे.या सर्व गोष्टींकरीता आपल्या प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती बाबत निविदा मागविणे व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.आपली मान्यता झाल्यानंतर आपण पुढे टेंडरीग करीता जाणार आहे.

मा.सभापती साहेब :- आपण ८४० घरे बांधणार आहे.ते नेमके कोणाला देणार आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- आपल्या कडे जे अर्ज आले या कॅटेगीरी मध्ये ८ हजार ९०० अर्ज आले.याचा ड्रॉ काढणार आहे.

मा.सभापती साहेब :- या करीता अटी काय आहेत.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- लाभार्थी चे वार्षीक उत्पन्न तीन लाखाच्या आत पाहिजे.त्याचे इतर कोणत्याही ठिकाणी स्वत:च्या मालकीचे घर नसले पाहिजे.महानगरपालिकेच्या क्षेत्रातला रहिवासी पाहिजे.केडगांव येथील घराची किंमत ७ लाख आली आहे.साडेचार लाखामध्ये लाभार्थाला घर पडणार आहे.काटवन खंडोबा येथील लार्भाथ्याची किंमत ९लाख १ हजार आली आहे.साडेसहा लाखामध्ये काटवन खंडोबा येथील घर पडणार आहे.यामध्ये आपण सर्व सुविधा देणार आहे.

मा.सभापती साहेब :- किती दिवसांमध्ये योजना पुर्ण होणार आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- केडगांवच्या योजने करीता तीस महिन्याची मुदत आहे.काटवन खंडोबा येथील योजनेस दोन वर्षाची मुदत आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेस या करीता किती खर्च करावा लागणार आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- महानगरपालिकस याचा कोणताही खर्च करावालागणार नाही.शासन अनुदान देणार आहे.उर्वरीत खर्च लाभार्थी देणार आहे.

मा.सौ. उषा नलवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. अनिता राठोड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मा.प्रंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी केंद्र सरकार अंतर्गत स्वच्छ भारत अभियान व प्रधानमंत्री आवास योजना प्रभावी पणे संपूर्ण देशामध्ये राबवून देशातील गरीबांचे स्पप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.पंतप्रधान आवास योजने अंतर्गत गरीबांसाठी ८४० घरकुले मंजूर झाली असून घरकुल या प्रकल्पाच्या उभारणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समिती नेमणुक करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्र.आयो. २०१५/ प्र.क्र.११०/ ग.निधो-२ (सेल ) दि.९ डिसेंबर २०१५ नुसार पंतप्रधान आवास योजनेतील घटक क्रमांक २ (AHP) अंतर्गत महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्तीस व याबाबत निविदा मागविणे त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.सौ. अनिता राठोड सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका